आयुक्त यांना माहितीस्तव सादर. **उल्हासनगर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

---

दिनांक : २० जुलै, २०२१

# प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

विषय :- बकरी ईद - २०२१ बाबत मार्गदर्शक सूचना

वाचा :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
३) गृह विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.डीआयएस-०६२१/प्र.क्र.१४३/ विशा-१ ब दिनांक २ जुलै, २०२१

वरील संदर्भ क्र. ३ अन्वये शासनाकडून बकरी ईद करिता प्राप्त परिपत्रकातील मार्गदर्शनास अनुसरुन पुढीलप्रमाणे मागदर्शक सूचना निर्गमित करणेत येत आहे. कोविड-१९ च्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता मागील वर्षापासून विविध उपक्रम, कार्यक्रम, सार्वजनिक उत्सव, सण अत्यंत साध्या पध्दतीने साजरे करण्यात आले आहेत. कोविडचा प्रादुर्भाव कमी झालेला असला तरीही धोका अद्यापही कायम आहे. त्यादृष्टीने सर्वांनी मोठया प्रमाणात एकत्रित येऊन उत्सव साजरा करणे उचित होणार नाही. या वर्षी दि. २१ जुलै, २०२१ रोजी "बकरी ईद" (चंद्र दर्शनावर अवलंबून) असून ती अत्यंत साधेपणाने साजरी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात "बकरी ईद" साजरा करणेबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. कोविड-१९ मुळे उदभवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीमुळे सर्व धार्मिक कार्यक्रमांना बंदी आहे. त्यामुळे बकरी ईदची नमजा मस्जिद अथवा ईदगाह अथवा सार्वजनिक ठिकाणी अदा न करता, नागरिकांनी आपल्या घरीच अदा करावी.

८. सध्या कार्यान्वीत असणारे जनावरांचे बाजार बंद राहतील. नागरिकांना जनावरे खरेदी करावयाची असल्यास त्यांनी ऑनलाईन पध्दतीने अथवा दुरध्वनीवरुन जनावरे खरेदी करावी.

९. नागरिकांनी शक्यतो प्रतिकात्मक कुर्बानी करावी.

१०. लागू करण्यात आलेले Level of Restrictions for Braking the Chain, Dated 4/6/2021 आणि त्यानंतर स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार इतर निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये बकरी ईद निमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही.

११. बकरी ईदच्या निमित्ताने नागरिकांनी कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी गर्दी करु नये किंवा एकत्र जमू नये.

१२. कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच महापालिका प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोरपणे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना शासनाकडून प्राप्त झाल्यास त्याचे देखील अनुपालन करावे.

१३. सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, कोरोना बाबत काळजी घ्यावी. त्रिसुत्र जसे नियमित भौतिक अंतर ठेवणे, मास्कचा वापर करणे, हात धुणे व सॅनिटायझरचा वापर करणे तसेच अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे पालन करावे.

तरी सर्व नागरिकांनी वरील सूचनांचे पालन करुन कोरोना आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेस सहकार्य करावे. उक्त परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे डॉ. राजा दयानिधी भा.प्र.से. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी परिपत्रकाद्वारे उल्हासनगर शहरातील नागरिकांना सुचित केले आहे. तरी उल्हासनगर शहरातील नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनास याबाबत सहकार्य करावे.

(डॉ. युवराज भदाणे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — मा. आयुक्त यांना माहितीस्तव सादर.

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

---

दिनांक : १७ जुलै, २०२१

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

**विषय :- बकरी ईद - २०२१ बाबत मार्गदर्शक सूचना**

**वाचा :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
**३) गृह विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.डीआयएस-०६२१/प्र.क्र.१४३/ विशा-१ ब दिनांक २ जुलै, २०२१**

वरील संदर्भ क्र. ३ अन्वये शासनाकडून बकरी ईद करिता प्राप्त परिपत्रकातील मार्गदर्शनास अनुसरुन पुढीलप्रमाणे मागदर्शक सूचना निर्गमित करणेत येत आहे. कोविड-१९ च्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता मागील वर्षापासून विविध उपक्रम, कार्यक्रम, सार्वजनिक उत्सव, सण अत्यंत साध्या पध्दतीने साजरे करण्यात आले आहेत. कोविडचा प्रादुर्भाव कमी झालेला असला तरीही धोका अद्यापही कायम आहे. त्यादृष्टीने सर्वांनी मोठया प्रमाणात एकत्रित येऊन उत्सव साजरा करणे उचित होणार नाही. या वर्षी दि. २१ जुलै, २०२१ रोजी "बकरी ईद" (चंद्र दर्शनावर अवलंबून) असून ती अत्यंत साधेपणाने साजरी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात "बकरी ईद" साजरा करणेबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. कोविड-१९ मुळे उदभवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीमुळे सर्व धार्मिक कार्यक्रमांना बंदी आहे. त्यामुळे बकरी ईदची नमजा मस्जिद अथवा ईदगाह अथवा सार्वजनिक ठिकाणी अदा न करता, नागरिकांनी आपल्या घरीच अदा करावी.
२. सध्या कार्यान्वीत असणारे जनावरांचे बाजार बंद राहतील. नागरिकांना जनावरे खरेदी करावयाची असल्यास त्यांनी ऑनलाईन पध्दतीने अथवा दुरध्वनीवरुन जनावरे खरेदी करावी.
३. नागरिकांनी शक्यतो प्रतिकात्मक कुर्बानी करावी.
४. लागू करण्यात आलेले Level of Restrictions for Braking the Chain, Dated 4/6/2021 आणि त्यानंतर स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार इतर निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये बकरी ईद निमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही.
५. बकरी ईदच्या निमित्ताने नागरिकांनी कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी गर्दी करु नये किंवा एकत्र जमू नये.
६. कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच महापालिका प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोरपणे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना शासनाकडून प्राप्त झाल्यास त्याचे देखील अनुपालन करावे.
७. सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, कोरोना बाबत काळजी घ्यावी. त्रिसुत्र जसे नियमित भौतिक अंतर ठेवणे, मास्कचा वापर करणे, हात धुणे व सॅनिटायझरचा वापर करणे तसेच अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे पालन करावे.

तरी सर्व नागरिकांनी वरील सूचनांचे पालन करुन कोरोना आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेस सहकार्य करावे. उक्त परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द यथास्थिति आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे डॉ. राजा दयानिधी भा.प्र.से. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी परिपत्रकाद्वारे उल्हासनगर शहरातील नागरिकांना सुचित केले आहे. तरी उल्हासनगर शहरातील नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनास याबाबत सहकार्य करावे.

(डॉ. युवराज भदाणे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — मा. आयुक्त यांना माहितीस्तव सादर.